# bhavishyavani भविष्यवाणी

भविष्य अलायन्सचे मासिक बातमीपत्रक | नोव्हेंबर २००८



अंतरंग –

- ताज हॉटेल मधील अतिरेक्यांच्या हल्ल्यांबाबत भविष्य अलायन्स तीव्र दु:ख व्यक्त करीत आहे.
- नववर्ष २००९ सर्वांना अतिशय चांगले आणि हिंसामुक्त जावो, ही सदिच्छा.
- आजपर्यंत काय घडले ?
    - संगणक मदतीने चालणाऱ्या प्रौढ शिक्षण कार्यक्रमाच्या अभ्यासक्रमात अधिक वाढ .
    - फूड डायव्हर्सिफिकेशन
    - धारावीतील डे केअर सेंटर
    - गर्ल्स गेनिंग ग्राउंड
    - हात धुणे
    - शिशू आहार – विषयावरील वर्तणूक बदल व संवाद कार्यक्रम - 'यशोदा प्रकल्प'.
    - संस्थेमध्ये डे केअर सेंटर्स व पाळणाघरे
    - आरोग्य संस्था आधारित समुपदेशन कार्यक्रम
    - मेळघाट दर्पण

- भविष्य अलायन्सच्या नवीन अधिकाऱ्याची ओळख .
- वाचकांचा प्रतिसाद


**आमचे सहयोगी भागीदार 'ताज ग्रुप ऑफ हॉटेल्स' यांचेसाठी आम्ही तीव्र दु:ख व सहानुभूती व्यक्त करतो.**

ताज ग्रुप ऑफ हॉटेल्सने आपले अतिशय निष्ठावान कर्मचारी आणि काही आदरणीय अतिथी गमावले, हे समजल्याने आम्हा सर्वांना मोठा धक्का बसला आहे.

त्यांच्या आत्म्यास शांती लाभो आणि त्यांच्या विरहाचे दु:ख सहन करण्यास , त्यांच्या जवळच्या व्यक्तींना परमेश्वर ताकद देवो.

- भविष्य अलायन्स टीम

**नववर्ष २००९ सर्वांना अतिशय चांगले व हिंसामुक्त जावो, ही सदिच्छा!**



प्रिय मित्र -मैत्रिणींनो,

२६ नोव्हेंबरचा दहशतवाद जरी आजही आपल्या मनात ताजा असला तरी आपल्याला सर्वांनाच पुढे जायचे आहे आणि आम्ही आशा करतो की येणारे वर्ष आपल्यापैकी प्रत्येकासाठी संस्मरणीय आणि हिंसामुक्त असेल.

**तुम्हा सर्वांनाच एक अतिशय आनंदी, सुरक्षित आणि भरभराटीचे नववर्ष मिळो, ही सदिच्छा!**

तुमच्याकडून सातत्याने मिळणाऱ्या सहकार्याबद्दल तुमचे मनापासून आभार. अलायन्सचे काम नेहमीच आव्हानात्मक राहिले आहे. तुम्ही आम्हाला त्याच उत्साहाने यापुढेही सहकार्य कराल आणि मुलांचे कुपोषण कमी करण्याच्या आमच्या कामात इतर अनेक लोकांचा हातभार लागेल, अशी आम्ही आशा करतो.

- भविष्य अलायन्स टीम.

## प्रकल्पांचा आढावा

### संगणक मदतीने चालणाऱ्या प्रौढ शिक्षण कार्यक्रमाच्या अभ्यासक्रमात अधिक वाढ



त्र्यंबकमधील प्रौढ शिक्षण कार्यक्रम

टी.सी.एस्., वचन आणि भविष्य अलायन्सने नासिकला एक एकत्रित भेट दिली. संगणक मदतीने चालणारा प्रौढ शिक्षण कार्यक्रम स्थानिक पातळीवर कसा चालू आहे हे समजून घेणे आणि कार्यक्रमात वाढ करण्यासाठी नियोजन करणे, हा या भेटीचा उद्देश होता. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या गटापैकी बहुसंख्य स्त्रिया आणि मुलींना छोटी छोटी वाक्ये वाचता येऊ लागली आहेत,असे लक्षात आले. कुटुंब आणि गावातून मिळालेले सहकार्य आणि प्रेरकांनी समर्पित वृत्तीने केलेले काम हयामुळे अतिशय दुर्गम भागातही हा कार्यक्रम यशस्वीरीत्या चालू आहे. हया भागातील अनियमित वीजपुरवठा आणि संगणकाची देखभाल हे दोन प्रश्न हया कार्यक्रमाच्या सुरळीत अंमलबजावणीत अडथळा बनत होते.

हा कार्यक्रम पुढे नेण्यासाठी अभ्यासक्रमात अतिरिक्त पाठयक्रम अंतर्भूत करण्याचे नियोजन सुरु आहे. तसेच माता-बालक सुरक्षा पत्रके, मीना ॲनिमेशन मालिका आणि युनिसेफने तयार केलेली व एच.आय.व्ही, लिंगभेद, मुलींचे शिक्षण आणि स्तनपानाची सुरुवात हया विषयांची माहिती देणारी फिल्म 'ब्रेस्ट क्रॉल ' हया गोष्टींचा त्यात समावेश आहे. १५ ते १७ डिसेंबर २००८ दरम्यान नासिक येथे याबाबत कार्यशाळा घेण्यात येईल. त्यात पहिल्या दोन दिवसात माता बालक सुरक्षा पत्रकांची ओळख करुन दिली जाईल. ही पत्रके युनिसेफच्या ट्रेनर्स अलायन्सने तयार केली आहेत. त्यानंतर १७ डिसेंबर ०८ रोजी हया अतिरिक्त पाठयक्रमावर चर्चा केली जाईल.

**फूड डायव्हर्सिफिकेशन :-** टी.आय.एस्. एस्. च्या डॉ.डी.पी सिंग यांनी बेसलाईन डेटाचे विश्लेषण केले आणि सहयोगी भागीदारांपुढे ते मांडले हा कार्यक्रम पुढे नेण्यासाठी आवश्यक ते आदेश, नंदूरबारचे जिल्हाधिकारी , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि एकात्मिक बाल विकास यंत्रणेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे जाहीर केले आहेत.

**धारावीतील डे केअर सेंटर :-**

धारावीतील कुंजीकुर्वेनगर येथील डे केअर सेंटर १४ नोव्हेंबर २००८ रोजी सुरु झाले. १ ते ३ वर्षे वयोगटातील कुपोषणाच्या एक व दोन श्रेणीतील २१ मुले सेंटरमध्ये दाखल झाली आहेत. सेंटरमधील मुलांना पोषक आहार देण्यासाठी एक स्वयंसहायता गट तयार झाला आहे. पाळणाघर शिक्षिका, अंगणवाडी सेविकेबरोबर सेंटर सांभाळत आहे. त्याच प्रकल्पातील अंगणवाडी सेविकांबरोबर काम करताना असे लक्षात आहे की त्यांना सुरळितपणे काम करण्यासाठी अधिक प्रेरणा मिळण्याची गरज आहे. त्यांना प्रेरणा मिळवून देण्यासाठी आणि 'शिशू आहार आणि सांभाळ याबाबत वर्तणूक बदल व संवाद' कार्यक्रम अधिक सशक्त होण्यासाठी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यासाठी स्नेहा संस्थेने १२ डिसेंबर २००८ रोजी आयोजित केलेल्या या कार्यशाळेत कुंजीकुर्वेनगर व कुंभारवाडा येथील सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि पर्यवेक्षिकांनी सहभाग घेतला.


कुंजीकुर्वेनगर मधील डे केअर सेंटर / अंगणवाडी

**गर्ल्स गेनिंग ग्राऊंड :-**

१३-१४ डिसेंबर २००८ या कालावधीत नवीमुंबईमध्ये झालेल्या कर्यशाळेत, सहयोगी संस्थांच्या प्रतिनिधींनी त्यात प्रत्यक्ष काम करताना आलेल्या अडचणी व आव्हाने मांडली. हया अडचणी व आव्हाने यावर चिंतन व परीक्षण करण्यात आले. त्यानुसार प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणाचा १० दिवसांचा दुसरा टप्पा जानेवारी २००९ पर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे.

परीक्षणाच्या प्रक्रियेत असे लक्षात आले की प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या ९ जागांपैकी ७ ठिकाणी स्थानिक पातळीवर प्रेरक प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे. ९ पैकी ८ ठिकाणी आश्रमशाळा आणि गाव / वस्त्यांतील ४४०० किशोरवयीन मुलींबरोबर काम सुरु झाले आहे. मुलींची गटबांधणी प्रक्रिया गाव / वस्तीत तसेच शाळा पातळीवरही सुरु झालेली आहे प्रत्यक्ष कार्यक्षेत्रातील सत्रांमध्ये सहभागी होणाऱ्या मुलींमध्ये प्रचंड उत्साह दिसून येतो आहे परंतु पोट भरण्यासाठी, जगण्यासाठी स्थलांतर करणाऱ्या मुलींमुळेच या कार्यक्रमाला आव्हानही आहे . या परिस्थितीला तोंड देण्यासाठी मुली परतल्यावर सत्रे पुन्हा घेण्याची तयारी सहयोगी भागीदार संस्थांनी दाखवली आहे. असे असले तरी ही नोव्हेंबर ते मार्च या कालावधीत, मुंबई वगळता, इतर ठिकाणी मोठया प्रमाणावर स्थलांतर होते. त्यामुळे एकूणच अंमलबजावणीसाठी हे एक मोठे आव्हान ठरणार आहे. बहुतेक वेळा अशा प्रकारच्या प्रक्रियांमध्ये मुली प्रथमच भाग घेत आहेत आणि त्यामुळे सत्रे व त्यातील संदेश समजून घेण्यास वेळ लागत आहे.


त्र्यंबक, नासिक येथील किशोरवयीन मुलींची सत्रे

आरोग्य विभागाच्या सहाय्याने मुलींची रक्तक्षय तपासणी जव्हार येथे हातात घेतली आहे. आरोग्य विभाग आणि एकात्मक बाल विकास यंत्रणा हया दोन्ही विभागांनी नऊही ठिकाणी हया कामास सहयोग देण्याची, मदत करण्याची आणि सहभागी होण्याची तयारी दर्शवली आहे. नंदूरबार जिल्हा मात्र सहयोगी भागीदार निवडीस उशीर झाल्याने मागे पडला आहे. सुरुवातीचा परिचय व प्रशिक्षण यानंतर तेथे नुकतीच कामाला सुरुवात होते आहे.

काही ठिकाणी बेसलाईन अभ्यासासाठी, पालकांची परवानगी मिळण्यास अपेक्षेपेक्षा जास्त वेळ लागला कारण पालक भेटणेच कठिण होते. तसेच या पालकांशी बोलून त्यांच्याशी संवाद साधणे व मुलींबरोबरच्या या कामाचे महत्त्व पटवून देण्यास बराच वेळ लागला.

डिसेंबरच्या पहिल्या आठवडयात बेसलाईन सर्व्हे पूर्ण झाला. त्याचे गुणवत्ता तपासणीचे काम चालू आहे. काही भागात स्थलांतरामुळे , ठरवलेला इच्छित आकडा गाठण्यास नवीन मुलीपर्यंत शोध घेऊन पोहोचावे लागले.
स्थानिक पातळीवरील परिस्थिती पहाता प्रकल्पाचा पहिला टप्पा गाव / वस्तीपातळीवर मार्च पासून जून २००९ पर्यंत लांबण्याची शक्यता आहे. आश्रमशाळातील मुली एप्रिल नंतर आपापल्या घरी जातात त्यामुळे त्यांची सत्रे एप्रिलच्या आत पूर्ण व्हावीत, यासाठी त्यांना जास्त वेळ द्यावा लागेल. मुलींबरोबरचे काम अर्थपूर्ण व्हावे यासाठी आवश्यक तो वेळ त्यांना मिळावा यासाठी भविष्य अलायन्स, सहयोगी भागीदार संस्थांबरोबर तसेच शाळा व्यवस्थापनाबरोबर काम करेल.

**'हात धुणे' वर्तणूक बदल प्रकल्प :-**हात धुणे प्रकल्पातील हिंदुस्तान युनिलिव्हर कंपनीच्या सध्याच्या जाणीवजागृतीच्या साहित्यात, प्रकल्पास अधिक अनुरुप होण्याच्या दृष्टीने बदल करण्यात आले आहेत. हे बदल युनिसेफकडे अंतिम करण्यासाठी मान्यतेसाठी पाठवण्यात आले आहेत. कामाचे दोन पातळयांवर नियोजन करण्यात आले आहे. १.नंदुरबार जिल्हयातील 'स्कूल इन डेव्हलपमेंट' मधील शिक्षक, उजाला कार्यक्रम व स्वयंसेवी संस्था असा २५ जणांचा मिश्र गट प्रमुख प्रशिक्षक म्हणून निवडण्यात आला आहे. हया गटाला प्रशिक्षण दिले जाईल जेणे करुन सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यक्रमावर प्रभाव टाकता येऊ शकेल.२. हया प्रशिक्षणाव्यतिरिक्त जिल्हयातील नंदुरबार तालुक्यात अधिक लक्ष्य केंद्रित करण्याचे ठरले आहे.

**यशोदा प्रकल्प :-** शिशू आहाराबाबत वर्तणूक बदल आणि संवाद या प्रकल्पातील सहयोगी भागीदार संस्था – हिंदुस्तान युनिलिवर , युनिसेफ, ग्रीन केटल आणि भविष्य अलायन्स यांचेमधे प्रकल्पातील भूमिका व जबाबदाऱ्या मान्य झाल्या आहेत. हया प्रकल्पाचे नाव 'यशोदा प्रकल्प' ठेवण्यात आले आहे. ६ ते ९ महिने वयोगटातील मुलांचे स्तपान व पूरक आहाराबाबत वर्तणूक बदल घडवून आणणे, हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. सल्लागारांनी तज्ञांबरोबर काही बैठका घेतल्या आणि संबंधितांच्या मुलाखती पूर्ण केल्या . तांत्रिक ज्ञान आणि विचार आम्हाला सांगितल्याबद्दल आम्ही, ब्रेस्ट फीडींग प्रमोशनल नेटवर्क ऑफ इंडियाचे डॉ.प्रशांत गांगल, के.ई.एम्. च्या डॉ.रुची नानावटी, टी.आय.एस.एस.च्या डॉ.वृंदा दत्ता आणि हिंदुस्तान युनिलिव्हरचे श्री.पॉलस व्हर्स्युरेन,श्रीम.मार्टी – व्हॅन - लिअरे आणि श्रीम. स्वाती गुप्ते तसेच श्री.अतुल पेठे यांचे मनापासून आभार मानतो. स्थानिक पातळीला अनुरुप होतील अशा प्रकारे संदेशांची रचना व्हावी यासाठी नंदुरबारच्या गावांमधील सध्याच्या प्रचलित पध्दती आणि गाव / वस्तीचा स्तनपानाबाबतचा दृष्टीकोन समजून घेण्यासाठी जमनालाल बजाज मॅनेजमेंट इन्स्टिटयूटमधील व्यवस्थापन प्रशिक्षणार्थींनी नंदुरबारमधील गावांना भेटी दिल्या. ग्रीन केटल सल्लागार आणि युनिसेफ यांनी १५ डिसेंबर २००८ रोजी नंदुरबार येथे एक एकत्रित भेट देण्याचे नियोजन केले आहे.

**संस्थेमध्ये डे केअर सेंटर्स आणि पाळणाघरे :-**धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील पहिल्या तुकडीने आत्यंतिक कुपोषित मुलांबरोबर २१ दिवस व्यतीत केले. त्या अनुभवाचे परीक्षण सुरु आहे आणि त्यानुसार पुढच्या तुकडीचे नियोजन केले जाईल . अमरावती जिल्हयात स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि एकात्मिक बालविकास यंत्रणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयात १० गावपातळीवरील पाळणाघरे स्थापन करण्यासंबंधी, सहयोगी भागीदार संस्थाबरोबर जागा, कर्मचारी नियुक्ती, आणि पशिक्षण नियोजन याबाबत प्राथमिक चर्चेची सुरुवात झाली आहे, १ ते ३ वर्षे वयोगटातील मुलांमधील कुपोषण रोखण्याच्या दृष्टीने ही पाळणाघरे मदत करतील अशी अपेक्षा आहे.

**आरोग्यसंस्था आधारित समुपदेशन कार्यक्रम :-**मेळघाट मधील बाल विकास केंद्रातील मातांना आरोग्य आणि पोषण शिक्षण देण्यात प्राथमिक आरोग्य केंद्रातील समुपदेशकांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. स्थानिक असल्यामुळे हे समुपदेशक माता आणि बालके दोघांबरोबरही स्थानिक भाषेत चांगल्या प्रकारे संवाद साधू शकतात. त्यामुळे त्यांना खात्री पटते आणि २१ दिवसांचा कालावधी केंद्रात काढण्यास ती माता तयार होते. मुले घरी गेल्यावर त्यांच्या मातांना त्यांची चांगली काळजी घेता यावी यासाठी हे समुपदेशक त्या मातांना स्तनपान, स्वच्छता, मुलांचे लसीकरण याबाबत माहिती देतात.

**मेळघाट दर्पण :-** जिल्हा परिषद आणि मेळघाटमधील खोज यांच्या संयुक्त विद्यमाने 'मेळघाट दर्पण' हे वार्तापत्र प्रकाशित केले जाते. मेळघाटमधील लोकांना आरोग्यसंदेश , प्रगती आणि आव्हाने याची माहिती देण्यासाठी , मेळघाट दर्पण हे एक महत्त्वाचे साधन बनेल अशी अपेक्षा आहे. पत्रकारितेची सुरुवात वस्तीपातळीवर होईल सध्या जरी माहितीचा ओघ जिल्हयाकडून तालुके आणि गावांकडे चालला असला तरी तेव्हा गाव / वस्तीपातळीवरील मातांची कष्टप्रद आव्हाने व सकारात्मक घटना / गोष्टी याचा उल्लेख मातांच्या व मुलांच्या आरोग्य सशक्तीकरणासाठी उपयोग होईल. पत्रकारितेची सुरुवात होण्यासाठी मदतकारक प्रक्रिया विचाराधीन आहे. हे पत्रक हा स्थानिक गाव / वस्त्यांचा आवाज बनेल. सुविधा पुरविणे आणि सुविधा लोकांपर्यंत पोहोचणे यातील दरी त्यातून भरुन निघेल. वस्तीपातळीवर पत्रकारीता करत असताना प्रसारमाध्यमातील मोठया संस्थेकडून सखोल माहिती व प्रशिक्षणामुळे हया तरुण पत्रकारांना गुंतागुंतीचे संदेश देणे सोपे जाईल व वाचनीय करण्याचे कौशल्य मिळेल.

## भविष्य अलायन्सच्या नवीन अधिकाऱ्याची ओळख :



डॉ.(श्रीम.) नीरा केवलरामानी

प्रिय जन हो,

युनिसेफ महाराष्ट्रच्या माध्यमातून भविष्य अलायन्सच्या कार्यक्रम मुख्याधिकारी म्हणून डॉ. (श्रीम) नीरा केवलरामानी यांनी काम सुरु केले आहे, हे सांगताना मला अतिशय आनंद होत आहे. डॉ. केवलरामानी यांनी वैद्यकीय शाखेतील पदव्युतर शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांनी सार्वजनिक आरोग्य विषयातील पदविका संपादन केलेली आहे आणि आरोग्य व कुटुंबकल्याण व्यवस्थापन विषयाचे प्रमाणपत्र त्यांनी मिळवलेले आहे.

भविष्य अलायन्समध्ये काम सुरु करण्यापूर्वी डॉ. केवलरामानींनी १९८१पासून मुंबई महानगर पालिकेत अनेक पदे भूषविली असून विविध कार्यभार सांभाळलेला आहे. त्यांचे सर्वात शेवटचे पद उपकार्यकारी आरोग्य अधिकारी (संसर्गजन्य रोग) हे होते. व्ही.जे.टी.आय., आय.आय.टी – मुंबई आणि ए.आय.आय. एल्.एस.जी यासारख्या विविध संस्थांमध्ये त्यांनी प्रशिक्षक तज्ञ मार्गदर्शक आणि अभ्यागत प्राध्यापक म्हणून काम केले आहे.

भविष्य अलायन्समधील आम्हा इतर सर्वांना तुम्ही जसे सहकार्य देत आहात तसेच सहकार्य त्यांनाही द्यावे ही विनंती. त्यांच्याशी संपर्क साधण्यासाठी त्यांचा ईमेल आय.डी neera@bhavishyaalliance.org.in असा आहे.

सदिच्छांसहित

- मूर्ती

## वाचकांचा प्रतिसाद

भविष्यवाणीच्या नवीन आवृत्तीचे आणि तुम्ही सुरु केलेल्या नवीन उपक्रमांचे मी आत्यंतिक कौतुक करतो. मला तुमचे, तुमच्या टीमचे आणि तुमच्या सर्व सहयोगी भागीदारांचे, मुलांना त्यांच्या आयुष्यात अधिक चांगली सुरुवात, चांगले भविष्य देण्याच्या दृष्टीने जे काही काम करत आहात, त्याबद्दल अभिनंदन करायचे आहे. अमरावतीमधील नवीन उपक्रमांबद्दल वाचण्याची मला जास्त विशेषकरुन उत्सुकता होती. अधिकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि तुमच्या कार्यक्रमास यश मिळावे यासाठी तुम्हाला, तुमच्या टीमला आणि भविष्यच्या सर्व सहयोगी भागीदार संस्थांना मी सदिच्छा देतो. वार्तापत्राचे पुढील अंक मिळावेत याबाबत मी उत्सुक आहे. तुम्हाला सदिच्छा ! - *डेव्हिड विंडर, डायरेक्टर, स्पेशल प्रोजेक्टस, सिनरगॉस इन्स्टिटयूट*

खूप छान वार्तापत्र , आमचा अंतर्भाव केल्याबद्दल धन्यवाद !-*देविका महादेवन , मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई मोबाईल क्रेशेस*

भविष्य अलायन्सची कामगिरी वाचून मला खूप आनंद झाला आहे. धन्यवाद , सदिच्छांसह -*मेजर जन (निवृत्त) बी.जी. शिवले, ए.व्ही.एस.एम कन्सल्टिंग ॲडव्हायजर , टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस*

तुमच्या ऑगस्टच्या भविष्यवाणीच्या अंकाबद्दल धन्यवाद . मेजर जनरल बी.जी शिवले यांचा केलेला ऋणनिर्देश आणि टी.सी.एस.चा सहभागाचा उल्लेख केल्याबद्दल आम्हाला खूप आनंद झाला. ताज हॉटेल्सच्या बेसलाईन सर्व्हेबाबतची नोंदही वाचली. भविष्यवाणी अशा सर्व घटनांची नोंद व प्रसार प्रभावीरीत्या करीत आहे. तुमच्या पुढील अंकांची आम्ही आतुरतेने वाट बघत आहोत. सदिच्छांसह,- *अनंत जी.नाडकर्णी , व्हाईस प्रेसिडेंट, ग्रुप कॉर्पोरेट सस्टेनेबिलीटी, टाटा कौन्सिल फॉर कम्युनिटी इनिशिएटिव्हज.*

तुम्हाला काही अभिप्राय, सूचना किंवा सहभाग द्यायचा असेल तर संगीता दासमहापात्र यांना लिहा:-
sangeeta@bhavishyaalliance.in / sangeetadm@yahoo.com, भविष्य अलायन्स, प्लॉट नं.१३१, जे लेन, सागर विहार जवळ, वाशी,नवी मुंबई - ४०० ७०३.Ph: ९१-२२-२७८२३२०३ /२७८२१६५७, फॅक्स - २७८२४६२९

bhavishya ALLIANCE